Made with Xodo PDF Reader and Editor

# महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद (मभूप), पुणे

## कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीची अधिसूचना : एप्रिल २०२५ ते मार्च २०३०

जा.क्र. - मभूप/ निवडणूक/ २०२५-२०३०/ ००८ दि. १० फेब्रुवारी २०२५

**मभूप कार्यकारी मंडळ निवडणुक (एप्रिल २०२५ - मार्च २०३०) : अधिसूचना**

प्रेषक
प्राचार्य डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव
(अध्यक्ष, मभूप कार्यकारी मंडळ निवडणूक समिती)
निवडणुकीचा पत्ता : नेताजी शिक्षण संस्थेचे
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
केडगाव - ४१२२०३, ता. दौंड, जि. पुणे (महाराष्ट्र).

प्रति,
सन्माननीय सर्व आजीव सभासद,
महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद (मभूप), पुणे

विषय - मभूपच्या कार्यकारी मंडळ निवडणूक - एप्रिल २०२५ ते मार्च २०३० ची अधिसूचना, याबाबत...

स.न.वि.वि.

महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद (मभूप), पुणे च्या विद्यमान कार्यकारी मंडळाच्या (शुक्रवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२५) सभेतील ठरावाचा संदर्भ असलेले मा. सचिव, मभूप, पुणे यांचे जा.क्रः मभूप/ २०२४-२५/ निवडणूक/ ०५, शनिवार दि. ०८ फेब्रुवारी २०२५ हे पत्र मिळाले. सदर पत्रान्वये असे समजते कि मभूपने माझ्या अध्यक्षतेखाली मभूपच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीसाठी (एप्रिल २०२५ ते मार्च २०३०), एक निवडणूक समिती स्थापन करून संबंधित निवडणूक प्रक्रिया संपन्न करण्याची मला विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर निवडणूकीच्या समितीचे गठन करण्यासाठी माझ्या सहकाऱ्यांची बैठक रविवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी वर उल्लेख केलेल्या माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपन्न झाली. या सभेतील ठरावानुसार प्रथमतः आमच्या नियुक्तीबद्दल आम्ही आपले (मभूपचे) आभार मानतो व आपण मभूपचे सर्व सन्माननीय आजीव सभासद निवडणुकीच्या या कार्यास सहकार्य कराल, असा विश्वास व्यक्त करतो.

मभूपच्या उपरोक्त पत्राचा स्वीकार करून, मी पुढील समिती स्थापन केलेली आहे. त्यामध्ये मी स्वतः, १) प्राचार्य डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव (अध्यक्ष, निवडणूक समिती) सह २) डॉ. भाऊसाहेब दादासाहेब गव्हाणे (उपाध्यक्ष, निवडणूक समिती), ३) डॉ. राजेंद्र निवृत्ती गायकवाड (सदस्य, निवडणूक समिती - आरक्षण प्रतिनिधी), ४) डॉ. अनुराधा वसंत गुजर (सदस्य, निवडणूक समिती - महिला प्रतिनिधी), ५) डॉ. नानासाहेब हरिभाऊ जावळे (सदस्य, निवडणूक समिती) आणि ६) डॉ. भाऊसाहेब पोपटराव दरेकर (सदस्य, निवडणूक समिती) हे या समितीमध्ये काम पाहतील. मी आणि संबंधित इतर सर्वांनी सदर नियुक्त्यांस व जबाबदारीस लेखी स्वरुपात मभूपकडे होकार कळविलेला आहे. तसेच सदर निवडणुकीचे संपूर्ण कार्यालयीन कामकाज हे मा. प्राचार्य डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव, (अध्यक्ष, मभूप कार्यकारी मंडळ निवडणूक समिती, नेताजी शिक्षण संस्थेचे सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव - ४१२२०३, ता. दौंड, जि. पुणे (महाराष्ट्र) या माझ्या पत्त्यावरून चालेल. सदर पत्ता हा मभूपच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक - एप्रिल २०२५ ते मार्च २०३० चा अधिकृत व एकमेव पत्ता असेल, असे या ठिकाणी ठरलेले असून ते जाहीर करण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी. याच पत्त्यावर पत्रव्यवहार करावा किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत भेट द्यावी, याच पत्त्यावर सदर निवडणुकीचे सर्व प्रकारचे काम चालणार आहे, तेव्हा याची कृपया आपण सर्वांनी नोंद घ्यावी की अन्यत्र कोठेही वा उपरोक्त निवडणूक समिती (अध्यक्ष, उपाध्यक्ष व समितीतील चार सदस्य) सोडून कोणासही पत्रव्यवहार वा संपर्क करु नये, तशा प्रकारे केलेला संपर्क व पत्र व्यवहार ग्राह्य धरल्य जाणार नाही. निवडणुकीच्या कार्यप्रणाली

Made with Xodo PDF Reader and Editor



संदर्भात विद्यमान मभूपचे कार्यकारी मंडळ वा इतर कोणत्याही आजीव सभासदास पत्रव्यवहार वा संपर्क ठेवता येणार नाही, तो अवैध असून ग्राह्य धरला जाणार नाही.

मभूपच्या घटना व नियमावलीमधील कलम १०.२ अन्वये आजीव सभासदामधून आगामी एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या पाच वर्षासाठी कार्यकारी मंडळाच्या १५ प्रतिनिधींची निवडणूक फेब्रुवारी ते मार्च २०२५ मध्ये पत्राद्वारे (टपाल) अथवा समक्ष बंद पाकिटातून गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यात येणार आहे, असे मभूपच्या सर्व आजीव सभासदांना सदर पत्राव्दारे/ निवडणूक अधिसूचनेव्दारे (जा.क्र. - मभूप/ निवडणूक/ २०२५-२०३०/ ००८, दि. १० फेब्रुवारी २०२५) अधिसूचित करण्यात येत आहे, त्या संबंधीचा सविस्तर तपशील (वेळापत्रक) पुढे दिलेला आहे.

**वेळापत्रक - कार्यकारी मंडळाच्या निवडणुक (एप्रिल २०२५ - मार्च २०३०)**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. १० फेब्रुवारी २०२५ | निवडणुकीची अधिसूचना प्रसारित करणे. |
| शुक्रवार | दि. १४ मार्च २०२५ | उमेदवारी अर्ज निवडणूक समितीकडे दाखल करण्याचा शेवटचा दिवस |
| शनिवार | दि. १५ मार्च २०२५ | उमेदवारी अर्जांची छाननी व नावांची घोषणा करणे (वेळ - स. ११ वा.) |
| रविवार | दि. १६ मार्च २०२५ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस (वेळ - दुपारी ०२ वाजेपर्यंत) |
| रविवार | दि. १६ मार्च २०२५ | उमेदवारी कायम करण्याचा दिवस (वेळ - सायं. ०५ वा.) |
| सोमवार | दि. १७ मार्च २०२५ | सर्व सभासदांना मतपत्रिका पाठवणे (आवश्यकता भासल्यास) |
| शनिवार | दि. २९ मार्च २०२५ | मतदाराकडून निवडणूक समितीकडे मतपत्रिका मिळण्याचा शेवटचा दिवस |
| रविवार | दि. ३० मार्च २०२५ | मत पत्रिका मोजणी करणे (वेळ - सकाळी ०९ वाजेपासून पुढे) |
| रविवार | दि. ३० मार्च २०२५ | निकाल जाहीर करणे (वेळ - मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लगेच) |
| सोमवार | दि. ३१ मार्च २०२५ | विद्यमान सचिवांकडे कागदपत्रे जमा करणे (वेळ - सायं. ०५ वाजेपर्यंत) |

उमेदवारांनी स्वतः अर्जाची छाननी, उमेदवारी कायम करण्याचा दिवस व मत मोजणीच्या प्रसंगी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे त्या-त्या दिवशी वरील ठिकाणी (निवडणुकीचा अधिकृत पत्ता) उपस्थित रहावे, अन्यथा आपली कोणतीही शंका व तक्रार ग्राह्य मानली जाणार नाही. विद्यापीठ निहाय मभूप मतदार संघ आणि त्यातून निवडून द्यावयाची प्रतिनिधींची संख्या (जागा) पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे आहे.

**मतदार संघ, जिल्हे व निवडून द्यावयाच्या प्रतिनिधींची संख्या (जागा)**

| अ.क्र. | मतदार संघ | संबंधीत मतदार संघामध्ये येणारे जिल्हे | जागा |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई, बृहन्मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | १ |
| २ | कोल्हापूर | कोल्हापूर सांगली, सातारा, सोलापूर | १ + (१) = २ |
| ३ | पुणे | पुणे, नाशिक, अहमदनगर | ४ + (१) = ५ |
| ४ | जळगाव | जळगाव, धुळे, नंदुरबार | १ + (१) = २ |
| ५ | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, बीड | १ |
| ६ | नांदेड | नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली | १ |
| ७ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ | १ |
| ८ | नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली | १ |
| ९ | इतर राज्ये/ प्रदेश | महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर सर्व राज्ये / प्रदेश | (१) |
| | | | एकूण १५ प्रतिनिधी |
| टिप | १. इतर राज्ये/ प्रदेश - यामध्ये महाराष्ट्राबाहेरील सर्व सदस्यांमधून प्रतिनिधित्व दिले जाईल.<br>२. कंसात दिलेली / दिलेल्या जागा या महिला सदस्यांसाठी राखीव आहे / आहेत.<br>३. मभूपने मभूपाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केलेला आपला (उमेदवार व मतदार) पत्ता हा निवडणूक प्रक्रियेतील सर्व बाबींसाठी ग्राह्य मनाला जाईल. | | |

Made with Xodo PDF Reader and Editor

# महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद (मभूप), पुणे

सर्व सभासदांना व त्या-त्या प्रदेशांना मभूपच्या सभासद संख्येप्रमाणे योग्य प्रतिनिधीत्व मिळावे, या दृष्टीने मतदार संघ तयार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये त्या-त्या मतदार संघाखालील जिल्हे व त्यामध्ये येणारे विद्यापीठ क्षेत्र, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, इतर सर्व क्षेत्रातील सभासदांच्या संख्येचा विचार केलेला आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे सभासदांचा मभूपने मभूपच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केलेला पत्ता, हा निवडणूक प्रक्रियेतील सर्व बाबींसाठी ग्राह्य मानला जाईल. त्यामध्ये जे सभासद शैक्षणिक वा इतर क्षेत्रात सध्या सेवेत नाहीत व कधीही नव्हते, त्या ही सर्व सभासदांचा मतदार संघ हा त्यांच्या वर उल्लेख केलेल्या पत्त्याप्रमाणेच ग्राह्य मानला जाईल. अन्य इतर पत्ता व त्याप्रमाणे मतदार संघ हे गृहीत धरला जाणार नाही.

सर्व प्रतिनिधींची बिनविरोध निवड झाल्यास मतपत्रिका पाठवून प्रक्रिया कार्यवाहीत करण्याची गरज उरणार नाही. त्यामुळे मतपत्रिका पाठविली जाणार नाही. अन्यथा मभूपच्या सर्व कार्यक्षेत्रातून (मतदार संघातून) मतदान घेतले जाईल. त्यामुळे उमेदवार कोणत्याही मतदार संघाचा असला तरी त्यास महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील मभूपच्या मतदानास पात्र सर्व आजीव सभासदांच्या मतदानातून निवडून यायचे आहे.

**नियम व अटी** - पुढील नियम व अटी उमेदवार व मतदार यांच्यासाठी अनिवार्य राहतील.

१. **मतदार** - मभूपचे आजीव सभासद आणि संस्था आजीव (प्रतिनिधी प्रत्येकी) सभासद, की ज्याची रविवार दि. ३१ मार्च २०२४ अखेर पूर्ण शुल्क जमा करून आजीव सभासद म्हणून मभूपच्या दफ्तरी नौद झालेली आहे. त्यांनाच मतदानाचा हक्क प्राप्त होईल.

२. **मतदार संघ** - महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील सभासदांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात (तक्त्यात नमूद केलेल्या जिल्ह्यांप्रमाणे) प्रतिनिधी निवडण्याची संधी प्राप्त व्हावी, या हेतूने मतदार संघ तयार केलेले आहेत. महिलांसाठी राखीव असलेल्या जागा या तक्त्यामध्ये कंसात नमूद केलेल्या आहेत, अशा जागांसाठी केवळ महिलांनाच उमेदवारी दिली जाईल.

३. **उमेदवार** - मभूपचा व्यक्तिगत आजीव सभासद असावा आणि त्याचे संबंधीत मतदार संघात नाव नोंदलेले असावे. उमेदवाराचे मभूपचे व्यक्तिगत आजीव सभासदत्व मंगळवार दि. ३१ मार्च २०२० पूर्वीचे असावे, उमेदवाराचे नाव ज्या मतदार संघात असेल तेथूनच उमेदवारी अर्ज दाखल करावा (पत्त्यामध्ये बदल केलेला असल्यास तो दि. ३१ मार्च २०२४ पूर्वीचा असावा). सदरच्या उमेदवारी अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये, उमेदवाराचा सूचक हा मभूपचा मंगळवार दि. ३१ मार्च २०२० पूर्वीचाच आजीव सभासद असणे, अनिवार्य आहे.

४. **मतदान** - मभूपच्या निवडणूक कार्यक्रम पत्रिकाप्रमाणे (उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे) आवश्यकता भासल्यास (सर्व प्रतिनिधींची बिनविरोध निवड न झाल्यास), सर्व मतदार संघातील सर्व मतदारांना टपालाने मतपत्रिका पाठविण्यात येतील. सदर मतपत्रिका भारतीय डाक सेवा द्वारे प्रमाणित करून (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग द्वारे वा अन्य सुयोग्य व सुलभसुविधेचा उपयोग करून) पाठविण्यात येईल. मतपत्रिकेची छायाप्रत, छायाचित्र, झेरॉक्स प्रत, स्कॅन प्रत या अन्य काही माध्यमातून तयार केलेली अवैध मतपत्रिका वापरता येणार नाही. निवडणूक समितीने टपालाने पाठविलेली मूळ मतपत्रिकाच वापरणे, बंधनकारक राहील.

५. मतदान, उमेदवारी अर्ज, मतमोजणी आणि निवडणुकीच्या इतर सर्व कार्याविषयी निवडणूक समितीचे सर्व निर्णय सर्वावर बंधनकारक राहतील, त्याबद्दल कोणासही तक्रार करता येणार नाही. तथापि आपणास संपूर्ण वा काही प्रमाणात या निवडणूक प्रक्रियेवर शंका, संशय, तक्रार वा इतर कोणताही विचार मांडावयाचा असल्यास अशा सभासदांनी मंगळवार दि. ०४ मार्च २०२५ पूर्वी प्रत्यक्ष वा मंगळवार दि. ०४ मार्च २०२५ पूर्वी पोहोचेल अशा रजिस्टर एडी पोस्टाने आपली बाजू मांडावी.

६. उमेदवारी अर्जासह निवडणूक शुल्कापोटी रु. २०००/- "कार्यवाह, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे" यांचे नावे, पुणे येथे वठणारा (जमा होणारा) व शुक्रवार दि. १४ मार्च २०२५ रोजी वा त्यापूर्वी काढलेला डी. डी. पाठविणे आवश्यक आहे. डी.डी. व्यतिरिक ऑनलाइन बँकिंग सुविधा, कि ज्यामुळे दिलेल्या तारखेच्या आधी मभूपच्या बँक खात्यावर शुल्क जमा झालेले असेल, अशा सुविधेने पाठविलेले शुल्क स्वीकारले जाईल. जमा केलेला डी.डी./ शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

७. उमेदवारी निश्चित झाल्यावरच आणि बिनविरोध निवड न झाल्यास उमेदवारास सर्व मतदारांची यादी आवश्यक असते. ती स्वतंत्रपणे कोणासही पुरवली जाणार नाही, उमेदवाराने संकेतस्थळावरील यादी वापरावी.

८. सोबतचा उमेदवारी अर्ज ग्राह्य मानला जाईन उमेदवारी अर्जावर उमेदवार व दोन (२) सुचकांच्या फोटोसाठी दिलेल्या चौकटीत फोटो विटकवून स्वतः फोटो धारकाने, तो आपल्या सहीने साक्षांकित करावा. आपली फोटोवरील स्वाक्षरी स्पष्टपणे दिसणे, आवश्यक व अनिवार्य आहे.

९. सदरची अधिसूचना (उमेदवाराने भरावयाच्या अर्जासह), मभूपच्या सन्माननीय आजीव सभासदांचे पत्ते (यादी), निवडणुकीचा अंतिम निकाल, निकालानंतर घेण्यात येणाऱ्या विद्यमान व नवनिर्वाचित सदस्यांच्या संयुक्त सभेची नोटीस, इत्यादी संबंधीची माहितीच केवळ मभूपच्या संकेतस्थळावर दिली जाईल. याशिवाय इतर कोणतीही माहिती वा सूचना संकेतस्थळावर दिली जाईलच, असे नाही. या व्यतिरिक्त सर्व माहिती, आपणास निवडणूक समितीकडे केव्हाही कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

१०. निवडणुकीचा समितीने तयार केलेला संपूर्ण अहवाल मभूपकडे देण्यासाठीची व निकालानंतर घेण्यात येणारी विद्यमान व नवनिर्वाचित सदस्यांची संयुक्त सभा, माझ्याकडे मंगळवार दि. १ एप्रिल २०२५ रोजी (सकाळी ठिक ११ वाजून ३० मिनिटांनी) घेतली जाईल. यामध्ये विद्यमान व नवनिर्वाचित सदस्यांपैकी बहुसंख्यांनी सभेच्या तारखेत वा वेळेत वा ठिकाणात बदल सुचविल्यास, तसा बदल केला जाईल. अन्यथा सदर पदभार विद्यमान सभासदांकडून नवनिर्वाचितांकडे सुपूर्द करणे व तो संबंधितांनी स्वीकारणे, या विषयीची सभा माझ्याकडे मंगळवार दि. १ एप्रिल २०२५ रोजी (सकाळी ठिक ११ वाजून ३० मिनिटांनी) घेतली जाईल.

ज्या व्यक्तिगत आजीव सभासदांना सदर पत्रातील निवडणूक नियम व अटीच्या अधीन राहून कार्यकारी मंडळाच्या प्रतीनिधीत्वासाठी उमेदवारी अर्ज भरावयाचा आहे, त्यांनी सोबतच्या उमेदवारी अर्जाच्या तीन मूळ प्रती पूर्णपणे भरून, मा. प्राचार्य डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव (अध्यक्ष, मभूप कार्यकारी मंडळ निवडणूक समिती), नेताजी शिक्षण संस्थेचे सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव - ४१२२०३, ता. दौंड, जि. पुणे (महाराष्ट्र) यांचेकडे शुक्रवार दि. १४ मार्च २०२५ (उमेदवारी अर्ज निष्डणूक समितेकडे दाखल करण्याचा शेवटचा दिवस) पर्यंत रजिस्टर एडी पोस्टाने किंवा समक्ष दाखल करावा.

सर्व सभासदांनी निवडणूक समितीला पूर्ण सहकार्य द्यावे, अशी सर्वांना नम्र विनंती आहे.

प्रति,

१. मभूपचे सर्व सन्माननीय आजीव सभासद

२. मा. धर्मदाय, सह-आयुक्त, पुणे विभाग, पुणे - १

आपले विश्वासू

डॉ. भाऊसाहेब दादासाहेब गव्हाणे
(उपाध्यक्ष, निवडणूक समिती)

प्राचार्य डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव
(अध्यक्ष, निवडणूक समिती)

डॉ. राजेंद्र निवृत्ती गायकवाड
(सदस्य, निवडणूक समिती - आरक्षण प्रतिनिधी)

डॉ. अनुराधा वसंत गुजर
(सदस्य, निवडणूक समिती - महिला प्रतिनिधी)

डॉ. नानासाहेब हरिभाऊ जावळे
(सदस्य, निवडणूक समिती)

डॉ. भाऊसाहेब पोपटराव दरेकर
(सदस्य, निवडणूक समिती)

नेताजी शिक्षण संस्थेचे सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव - ४१२२०३, ता. दौंड, जि पुणे (महाराष्ट्र)

Made with Xodo PDF Reader and Editor

# **महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद (मभूप), पुणे**

कार्यकारी मंडळाच्या निवडणुक (एप्रिल २०२५ - मार्च २०३०)

## उमेदवाराने भरावयाचा अर्ज

मतदार संघाचे नाव ..................................................................................................

उमेदवाराचे नाव व पत्ता

संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) ......................................................................................

पत्ता ......................................................................................................................

...............................................................................................................................

ओळखपत्राच्या आकाराचे नव्याने काढलेले स्वतःचे छायाचित्र येथे चिटकवून स्वतः

सूचक ०१ : नाव व पत्ता

संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) ......................................................................................

पत्ता ......................................................................................................................

...............................................................................................................................

सूचकाची सही व तारीख ............................................................................................

ओळखपत्राच्या आकाराचे नव्याने काढलेले स्वतःचे छायाचित्र येथे चिटकवून स्वतः

सूचक ०२ : नाव व पत्ता

संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) ......................................................................................

पत्ता ......................................................................................................................

...............................................................................................................................

सूचकाची सही व तारीख ............................................................................................

ओळखपत्राच्या आकाराचे नव्याने काढलेले स्वतःचे छायाचित्र येथे चिटकवून स्वतः

### उमेदवाराचे सम्मती पत्र

मी (संपूर्ण नाव आडनाव प्रथम) ................................................................... मभूपचा ........................

वर्षापासूनचा व्यक्तिगत आजीव सभासद असून माझी सदर उमेदवारीस सम्मती आहे. मला मभूप निवडणूक समितीने निर्धारित केलेले व वेळोवेळी नव्याने येणारे सर्व नियम व अटी मान्य आहेत. मी परिषदेच्या विकासासाठी निःस्वार्थी भावनेने व कोणत्याही आर्थिक लाभाशिवाय काम करीन. तरी माझा उमेदवारी अर्ज स्वीकारावा, अशी विनम्र विनंती.

स्थळ ..........................

दिनांक .......................... उमेदवाराची सही

उमेदवाराचे नाव ..................................................................................................